| | | |
|---|---|---|
| नवी मुंबई महानगरपालिका | Navi Mumbai Municipal Corporation | बेटी बचाओ save the girl child |
| न.मु.म.पा मुख्यालय,आरोग्य विभाग, 3 रा मजला, सेक्टर 15 ए.,सी.बी.डी., नवी मुंबई 400 614.दूरध्वनी क्र : 27567261 | N.M.M.C HEAD OFFICE HEALTH DEPT. 3RD FLOOR, SEC-15A,CBD, NAVI MUMBAI – 400 614.TEL. No. : 2756 7261 | |


## आरोग्य विभाग- पशुवैद्यकीय सेवा
## पशुवैद्यकीय सेवांतर्गत खालील पदांची 'कंत्राटी पध्दतीने भरती

नवी मुंबई महानगर पालिका पशुवैद्यकीय सेवा अंतर्गत नेरुळ येथील पशु वैदयकिय रुग्णालय करीता पशुवैद्यकीय अधिकारी व इतर पदांकरीता मासिक ठोक मानधनावर सहा महिन्याच्या कालावधीकरीता खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रतिमहा ठोक मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक व पात्र उमदेवारांनी विहित नमुन्यात अर्ज आरोग्य विभाग, 3 रा मजला, नमुंमपा मुख्यालय, प्लॉट नं.1, से.15 अे, किल्लेगावठाण जवळ, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई 400614 येथे दि.22/09/2025 ते 01/10/2025 पर्यंत सादर करावे.

| अ.क्र | पदाचे नांव | शैक्षणिक पात्रता | पदांची संख्या | मासिक ठोक् मानधन |
|---|---|---|---|---|
| 1 | निवासी पशुवैद्यकीय अधिकारी | बी.व्हि.एस,सी. आणि अे.एच. किंवा एम.व्हि.एस,सी. पदव्युत्तर पदवी | 3 | 1,00,000/- |
| 2 | पशुवैद्यकीय शल्यचिकित्सक, | शस्त्रक्रिया आणि रेडिओलॉजीमध्ये विशेषज्ञता असलेली पशुवैद्यकीय विज्ञानातील पदव्युत्तर पदवी (MVSc) | 1 | 10,000/- (प्रती दिन व आठवड्यातून जास्तीत जास्त दोनदा) |
| 3 | पशुवैद्यकीय स्त्री रोग तज्ञ | पशुवैद्यकीय स्त्रीरोग प्रसूतीशास्त्रातील विशेषज्ञतेसह पशुवैद्यकीय विज्ञान पदव्युत्तर (MVSc) पदवी | 1 | 10,000/- (प्रती दिन व आठवड्यातून जास्तीत जास्त दोनदा) |
| 4 | पशुवैद्यकीय पॅथॉलॉजिस्ट | पशुवैद्यकीय पॅथॉलॉजी आणि सूक्ष्मजीवशास्त्र मध्ये पदव्युत्तर पदवी (MVSc) | 1 | 10,000/- (प्रती दिन व आठवड्यातून जास्तीत जास्त दोनदा) |
| 5 | पशुधन पर्यवेक्षक | शासन मान्यताप्राप्त विद्यापीठातून पशुधन पर्यवेक्षक, 2 वर्षांचा डिप्लोमा | 2 | 29538/- (किमान वेतनानुसार) |

वरील पदांसाठीची सविस्तर जाहिरात, विहित अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, शैक्षणिक अर्हता, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया व इतर महत्वाच्या सर्व सूचना सविस्तर तपशीलासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळावरील Others मध्ये Additional Content मध्ये Jobs at NMMC लिंकमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर माहितीचे व सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन व्हावे.

**अर्ज करावयाच्या पध्दतीबाबत सर्वसाधरण सुचना/माहिती खालील प्रमाणे आहेत.**

सदर जाहीरातीतील नमुद सर्व सूचनांचे काळजी पूर्वक वाचन करुन विहित केलेल्या पध्दतीनुसारच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये उमेदवाराने नमुद केलेल्या माहितीच्या आधारे व सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांच्या/कागदपत्रांच्या आधारे उमेदवार पात्र व अपात्र ठरविण्यात येईल. व त्याआधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

अर्ज स्वीकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवाराची निवड झाली असा होणार नाही. निवड प्रक्रिये दरम्यान कोणत्याही वेळी किंवा उमेदवाराच्या निवडी नंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याने किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमदेवाराची/निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

**1) अर्ज करावयाच्या अनुषंगाने सुचना -**

1.1 उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून नियुक्ती 6 महिन्यांच्या कालावधी करीता राहील.

1.2 सर्व उमेदवारांनी जाहिरात मध्ये नमुद अर्जा मध्ये अर्ज विहित कालावधीत भरणे आवश्यक आहे.

1.3 अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्दयाची माहिती अचूक भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

1.4 पूर्ण भरलेला अर्ज व सर्व कागदपत्रे वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग, 3 रा मजला, नमुंमपा मुख्यालय, प्लॉट नं. 1, से.15 ए, किल्ले गावठाण जवळ, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई -400614 येथे (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) प्रत्यक्षात (By Hand) व कुरीअरने दि.22/09/2025 ते दि.01/10/2025 पर्यंत सादर करण्यात यावेत. दिलेल्या मुदतीनंतर सादर करण्यात येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. (टपालाने/कुरीयरने सादर करण्यात आलेले अर्ज विहित कालावधीत या कार्यालयात पोहोचतील याची दक्षता घ्यावी. उशीरा प्राप्त अर्जाची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.)

**2) वयोमर्यादा :-**

2.1. पशुवैद्यकीय अधिकारी या संवर्गासाठी अर्ज करणा-या उमेदवारांचे वय 65 वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.

2.2. पशुधन पर्यवेक्षक या संवर्गासाठी अर्ज करणा-या उमेदवारांचे वय 38 वर्षापेक्षा जास्त असता कामा नये. (मागासवर्गीय उमेदवारांचे बाबतीत कमाल 43 वर्षे असावे.)

**3) अर्ज भरण्याच्या सुचना :-**

3.1 उमदेवाराने स्वत:चे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्रा प्रमाणेच अचूक पणे नोंदवावे. अर्जा सोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

3.2 माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाण पत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीख अर्जात नमूद करावी.

3.3 जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष) अर्जात अचूक नमुद करावे.

3.4 अर्जात उमेदवाराचे लिंग या बाबतची माहिती नमूद करावी.

3.5 अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) अर्जा सोबत सादर करणे आवश्यक आहे.

3.6 उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा आणि त्याने सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सादर करणे आवश्यक राहील.

3.7 उमेदवाराने आपला जातीचा तपशिल अचूकपणे नमूद करावा.

3.8 उमेदवाराने आपला सध्याचा पत्ता व कायम स्वरुपी पत्ता अर्जामध्ये अचूक नमूद करावा.

3.9 अर्जामध्ये उमदेवाराने स्वत:चा वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे. पात्र उमदेवारांची यादी उपरोक्त नमुद संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर ई-मेल आयडी पद भरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत चालू राहील व ई-मेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

3.10 पदभरतीबाबत पात्र/अपात्र ठरणाऱ्या उमदेवारांची यादी आणि पदभरतीबाबतच्या आवश्यक सुचना व सुधारणा वेळोवेळी nmmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

3.11 अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा, याबाबत चे हमी पत्र देण्यात यावे.

**4) शैक्षणिक अर्हता :-**

4.1 शैक्षणिक अर्हते बाबतचा सविस्तर व अचूक तपशिल नोंद करावा.

4.2 अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिराती मध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.

4.3 अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुण व गुणांची टक्केवारी अर्जात नमुद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.

4.4 उमेदवारांची अर्जामध्ये नमुद माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.

4.5 पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त विद्यापिठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

**5) अनुभव :-**

5.1 शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा फक्त शासकीय व निमशासकीय व खाजगी अनुभव ग्राहय धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापुर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.

5.2 अनुभवाचा तपशिल नमुद करीत असताना ज्या शासकीय, निम शासकीय व खाजगी कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे अशाच शासकीय, निम शासकीय व खाजगी कार्यालयाचा तपशिल फॉर्ममध्ये नमुद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राहय धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.

5.3 अनुभव प्रमाणपत्रामध्ये तपशिल नमुद करताना रुजू दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अूचकपणे नमूद करावा. सदर कलावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.

5.4 ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राहय धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

5.5 MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा.

**6) लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र :-**

6.1 नियमानुसार दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमदेवार पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.

6.2 उमेदवाराने अर्जामध्ये फोटोकरीता राखीव जागेवर त्याचे अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करु नये. व फोटो स्वसाक्षांकीत करावा.

6.3 राखीव जागेत स्वाक्षरी करावी.

**7) निवडीची कार्यपद्धती :-**

7.1 Walk-in Selection पध्दतीने, 100 गुणांपैकी- पशुवैद्यकीय पदवी परिक्षेतील गुण (60), पशुवैद्यकीय पदव्यूत्तर पदवी (20), पशुवैद्यकीय अनुभव (औषधोपचार, शस्त्रक्रीया इ.) (20), विचारात घेऊन उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

7.2 उमेदवाराने पशुवैदयकीय शास्त्रातील मान्यताप्राप्त विदयापीठातील पदवी एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण केली असल्यास दुस-या प्रयत्नासाठी 5 टक्का गुण, तिस-या प्रयत्नासाठी 10 टक्के गुण एकूण गुणामधून वजा केले जातील. तीन पेक्षा अधिक प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराचा पशुवैदयकीय अधिकारी या पदासाठी विचार केला जाणार नाही.

7.3 मौखिक चाचणी / मुलाखत घेण्यात येणार नाही.

7.4 दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण असल्यास उमेदवाराच्या वयाच्या ज्येष्ठतेला प्राधान्य देण्यात येईल.

**8) सर्वसाधारण सुचना :-**

8.1 सदर पदभरती प्रक्रियेबाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती आरोग्य विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमदेवारांनी nmmc.gov.in या संकेतस्थळास भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

8.2 जाहिरातीत नमुद केलेली पदे ही पूर्णत: कंत्राटी स्वरुपाची असून ती नमुमपाची नियमित पदे नाहीत. या पदांचा नमुमपाच्या पदांशी काहीही संबंध नसून उमेदवार नमुमपाच्या नियमित पदावर समायोजन करण्याची मागणी करु शकणार नाही.

8.3 रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबतचे, भरती प्रक्रिया अंशतः/पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार नवी महानगरपालिका आयुक्त यांना राहतील. यावावत कोणालाही कोणताही वाद कोणत्याही मा. न्यायालयात व इतर ठिकाणी उपस्थित करता येणार नाही.

8.4 जाहिरातीत नमुद केलेले अनुक्रमांक 1 ते 4 या पदाचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

8.5 अनुक्रमांक 5 वरील पशुधन पर्यवेक्षक यांचे मानधन किमान वेतनानुसार देय राहील.

8.6 निवड झालेल्या उमेदवारांना पशु वैदयकिय रुग्णालय, नेरुळ या ठिकाणी नियुक्ती देण्यात येईल, याची नोंद घ्यावी. नियुक्ती आदेश दिल्यानंतर 7 दिवसांच्या आत नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील.

8.7 उमेदवाराने कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल. अन्यथा त्यांचे नियुक्ती आदेश संपुष्टात आणून प्रतिक्षाधीन यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

8.8 निवासी पशु वैदयक यांची कंत्राटी तत्वावर 3 वर्षाचे हमी पत्र (Bond) घेवुन निव्वळ कंत्राटी तत्वावर 6 महिन्यांकरीता नियुक्ती करण्यात येईल.तसेच निव्वळ कंत्राटी तत्वावर नेमणुक असुन भविष्यात कोणत्याही प्राधीकरण,मा न्यायालयात कायमस्वरुपी सेवेत दाखल होणेसाठी अर्ज करणार नाही बाबतचे हमीपत्र दयावे लागेल.

8.9 कंत्राटी तत्वावर नियुक्ती 6 महिन्यांच्या कालावधीकरीता असून त्यांच्या कंत्राटी सेवेच्या कालावधीमध्ये दर 6 महिन्यानंतर 1 दिवसाचा सेवा खंड देण्यात येईल. तसेच आवश्यकतेनूसार प्रत्येक 06 महिन्यानंतर मा. आयुक्तांच्या मान्यतेने मुदतवाढ देण्यात येईल.

8.10 निवासी पशुवैद्यक उमेदवाराने नियुक्ती नंतर 07 दिवसांच्या आत रु.1,00,000/- इतकी अनामत रक्कम (एक महिन्याचे मानधन) रुजू होण्यापूर्वी नवी मुंबई महानगरपालिकेच्या लेखा विभागात भरणे आवश्यक आहे.

8.11 अनामत रक्कमेचा परतावा, कंत्राट कालावधी पूर्ण झाल्यावर परत करण्यात येईल.

8.12 कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता सेवा समाप्त केली जाईल.

8.13 विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह आपला अर्ज बंद लिफाफा वर खालील प्रमाणे नमुद करुन सादर करावे.

- **पदाचे नाव :-**

1) अर्ज सादर करावयाचा पत्ता :- वैद्यकीय आरोग्य अधिकारी,
आरोग्य विभाग,3 रा मजला,
नमुंमपा मुख्यालय, प्लॉट नं. 1,
से.15 ए, किल्ले गावठाण जवळ,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई -400614

2) अर्ज दि. दि.22/09/2025 ते दि.01/10/2025 पर्यंत कार्यालयीलन कामकाजाच्या दिवशी (शनिवार, रविवार व शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत सकाळी 9.45 ते सायंकाळी 6.15 या वेळेत सादर करावे. दि.01/10/2025 नंतर प्राप्त अर्ज ग्राहय धरले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

3) भरती प्रक्रिया स्थगित करणे, रद्द करणे, पदभरती प्रक्रियेत बदल करणे, पदांच्या संख्येत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त, नमुंमपा यांच्या स्तरावर राखून ठेवण्यात आले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

- आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित केलेल्या प्रति अर्जाच्या नमुन्यात जोडाव्यात.

1. वयाचा पुरावा
2. शैक्षणिक अर्हतेबाबतची गुणपत्रिका व प्रमाणपत्र
3. कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (As Applicable)
4. शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र
5. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
6. आधारकार्ड, पॅनकार्ड
7. सध्याचा फोटो
8. अर्जदार विवाहीत असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette)
9. लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)
10. फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमी पत्र

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**नवी मुंबई महानगरपालिका**

**वैयक्तीक माहितीपत्र (BIO-DATA)**

**(निवासी पशुवैदयक/पशुवैद्यक विशेषज्ञ अधिकारी)**

**(कंत्राट पध्दतीने)**

**अर्जाचा नमुना**

1) (अ) संपूर्ण नांव (आडनांव प्रथम) :

(ब) वडिलांचे / पतीचे संपूर्ण नांव :

(क) विवाहित महिलांच्या बाबतीत त्यांचे विवाहापूर्वीचे नांव :

2) (अ) राहण्याचा पत्ता (पोस्टल पिनकोडसहीत) :

(ब) दूरध्वनी क्र. (एस.टी.डी. क्रमांकासह) : -------------------------------------------------------

भ्रमणध्वनी क्र. -------------------------------------------------------

ई-मेल आयडी ----------------------------------------------------------

आधार कार्ड क्रमांक- ..........................................................................................................

3) लिंग : पुरुष ------------ स्त्री ---------- तृतीयपंथी ----------

4) अ) जन्मदिनांक :- (दिनांक/महिना/वर्ष)

व) अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास असलेले वय : वर्षे ......... महिने ............ दिवस..........

5) अर्ज ज्या पदासाठी केला आहे त्या पदाचे नांव:-

6) (अ) शैक्षणिक अर्हता :

| शैक्षणिक अर्हता | शालान्त परीक्षा मंडळ /विद्यापीठाचे नांव | गुणांचा तपशील | | टक्केवारी | उत्तीर्णतेचे प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | | |
| एच.एस.सी. | | | | | |
| बी.व्हि.एस.सी आणि ए.एच. | | | | | |
| एम.व्हि.एस.सी (विषय) | | | | | |
| विशेष प्राविण्य /इतर | | | | | |

7) पशुवैद्यकीय अनुभवाचा तपशील:- (आवश्यक कागदपत्रे सोबत जोडण्यात यावी)

अ) ------------------------------------------------------------------------------------------------------------

ब) ------------------------------------------------------------------------------------------------------------

क) ------------------------------------------------------------------------------------------------------------

8) उमेदवार सध्या नोकरी करत आहे किंवा नाही -- होय/नाही

असल्यास त्याबाबतचा तपशील - ---------------------------------------------------------------------------

9) राज्य पशुवैद्यक/भारतीय पशुवैद्यकीय कायदा 1984 अंतर्गत नोंदणी असणे : -------------------------------
आवश्यक असून नोंदणी केलेला नोंदणी क्रमांक नमूद करावा. (प्रत जोडावी)

10) संगणक विषयक ज्ञान एम.एस.सी.आय.टी. -- होय/नाही. : ---------------------------------------------------
किंवा शासनाने विहित केलेले संगणकविषयक अभ्यासक्रम उत्तीर्ण

11) स्थानिक पोलीस स्टेशनचा पत्ता: ----------------------------------------------------

12) अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का? -- होय /नाही.

ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

क) उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का? असल्यास तपशील द्यावा.

1. मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातील दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी --------------------- ----------------------या पदाकरीता पात्र आहे. वरीलपैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास नवी मुंबई महानगरपालिका माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करू शकते, याची मला जाणीव आहे.
2. मी ------------------------------------------------------- पतिज्ञेवर लिहुन देतो कि, न.मु.म.पा च्या आरोग्य विभागाचे अधिनस्त पशु वैदयकिय सेवेतील -------------------------------------- या पदासाठी अर्ज केला असुन सदरचे पद हे निव्वळ कंत्राटी पध्दतीने आहे हे मला ज्ञात आहे. तसेच भविष्यात या व इतर कोणत्याही पदावर कायमस्वरुपी वा नमुमपा इतर पदावर मी कोणत्याही प्राधीकरण,मा.उचच न्यायालय इ ठिकाणी अर्ज करुन हक्क् मागणार नाही. करीता हमीपत्र देत आहे.

दिनांक :-

ठिकाण:-

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही/

(अर्जदाराचे नांव)

सोबत : १)

२)

३)

**EMPLOYMENT CONTRACT**

Initially for the period of 6 months only.

Contract between the Medical officer of Health/Veterinary Officer Navi Mumbai Municipal Corporation and Mr.Mrs./Mr./Ms________________________________________who is assigned as__________________ on purely contract basis.

This AGREEMENT is entered between the Medical officer of Health/Veterinary Officer Navi Mumbai Municipal Corporation here in after referred to as 'NMMC'.

OF THE FIRST PART

And

Mrs./Mr./Ms_________________________________________________R / O

____________________________________________________________

____________________________________________________________

(Hereinafter referred to as "the temporary contractual employee").

OF THE SECOND PART

WHEREAS agrees to execute the tasks assigned to him/her by the Medical officer of Health/Veterinary Officer Navi Mumbai Municipal Corporation as per the following terms and conditions;

1. Terms of Employment:

The Employment of the contractual employee shall initially for the period of 6 months only. His/her term commencing on ______________________and ending on ________________

**1) The Conditions of Employment**

(1) Since his/her appointment is being made for a specified period he/she will neither have any right nor a lien on the post held by him/her. Also he/she will not claim regular employment, absorption, regularization, age relaxation, earned leave, annual increment to condone technical breaks even if there is such a vacancy for the post held by him/her. Otherwise if he/she wants to leave the service, he/she can do this by serving one month notice or salary of Two month if Two month notice is not served. No compensation or remuneration of unexpired period of contract will be payable by the society if his/her services are terminated or he/she resign from the services of the society before the specified period of contract.

(2) The temporary contractual employee will not be considered as the employee of the Navi Mumbai Municipal Corporation.

(3) His/ her assignment is made on the basis of his / her particulars such as qualification etc. as given his / her application and in case any information is given by him / her is found false or incorrect his / her appointment will be deemed void and liable to termination without any notice / salary.

(4) He / she will be bound by the rules regulations and office orders in force and framed by the society from time to time and the same will be from part of his / her terms and conditions of employment with the society as and when made effective.

(5) His / her continuance in service for 6 month on Contractual basis is subject to his / her remaining physically and mentally fit.

(6) His / her working hours will be generally 8 Hrs., in a 3 shift (24X7) on all days Excluding Weekly Off. This timing can be changed as per the requirement and decision of NMMC Senior veterinary officer.

(7) He /she will be allowed to enjoy Public Holidays declared from time to time by Government in addition to weekly holidays. A total of 06 minor leaves will be availed during the said period, apart from which, public holidays will be availed like NMMC employees. No other leaves will be admissible.

(8) The total duration of leave and government holidays taken simultaneously during a contract period should not exceed 5 days.

(9) He / she will discharge his / her duties effectively to the satisfaction of the Medical officer of Health/Veterinary Officer Navi Mumbai Municipal Corporation.

(10) He / she will not initiate any legal proceeding against the NMMC.

(11) He / she will not be allowed to contest any type of election during contract period

(12) His / her legal heirs will not entitle to make claim on compassionate ground.

(13) He / she shall not be entitled to any preferential claim for regular appointment under normal process of selection.

(14) His/her appointment is purely on contract basis and on a consolidated remuneration.

**2. Remuneration:**

3. The remuneration of Shri/Smt. -----------------------------------------------------as ------------------------------------will be paid of **Rs.-------------------------/- (Rs. -------------------------------------------)** per month all inclusive and no other allowances such as Dearness Allowances will be admissible.

**4. Notices:**

Any notice required by this agreement or given connection with it, shall be in writing and shall be given to the appropriate party by personal delivery or by certified mail; postage prepaid or recognizes overnight delivery services.

**5. Final Agreement:**

This Agreement terminates and supersedes all prior understanding or agreements on the subject matter hereof. This agreement may be modified only be further writing that is duly executed by both parties.

**6. Headings:**

Headings used in this agreement are provided for convenience only and shall not be used to construe meaning or intent.

**7. Modification :**

Any modification of this agreement or additional obligation assumed by either party in connection with this agreement shall be binding only if evidence in writing signed by each party or an authorized representative of each party.

**8. Confidentiality:**

The Contractual Employee acknowledges that, in the course of performing and fulfilling his / her duties hereunder, he / she may have access to and be entrusted with confidential information concerning the present and contemplated financial status and activities of the society, the disclosure of any of which confidential information to competitors of the society would be highly detrimental to the interests of the society. The Contractual Employee further acknowledges a proprietary right which the society is entitled to protect. Accordingly, the Contractual Employee covenants and agree with the society that he will not, during the continuance of this Agreement, disclose any of such confidential information to any person, firm, corporation, offices nor shall he / she use same.

**9. Termination :**

Thus Employment contract may be terminated by:

A) Mutual agreement of the parties.

B) Disability of the Contractual Employee. If the contractual employee is permanently disable or is otherwise unable to perform his / her duties because of sickness, accident, injury, or mental incapacity, the society shall have the option to terminate this agreement with no obligation to pay remuneration.

C) Discharge of cause. in the event of Contractual Employee vomits a material breach of the obligations conditions and duties of Contractual Employee under this Agreement or commits any acts designated as conduct violation or for just cause shall be considers cause for immediate dismissal. Society may terminate this agreement, during its term, only for ‘cause’ which for purpose herein, shall mean Contractual

Employee (i) dishonesty; or (iii) gross misconduct or gross dereliction of duty; or (iv) fraud, misrepresentation or other acts of moral turpitude or criminal conduct; or (v) a material breach of any term of this Agreement; or **(vi) Any irregularity in the attendance, remains absent for a period of 1 months or more without sanctioned leave or absence beyond the sanctioned leave, then his/her services will stand terminated automatically.**

If the above terms and conditions are acceptable to you, please sign the accompanied office copy in token and acceptance and return the same for office record.

Place:-

Date:-

Medical officer of Health
Navi Mumbai Municipal Corporation

I accept, the offer and terms and conditions mentioned in the letter

Signature :---------------------------------

Name : ______________________________

Address :-----------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

Mobile No.:-----------------------------------------------

Signature,Name & address of two witnesses:

| Name | Post | Signature | Address |
|---|---|---|---|
| 1) Mr./ Mrs. | | | |
| 2) Mr./ Mrs. | | | |

# नवी मुंबई महानगरपालिका
## वैयक्तीक माहितीपत्र (BIO-DATA)
## (पशुधन पर्यवेक्षक) (कंत्राटी पध्दतीने)

### अर्जाचा नमुना

1) (अ) संपूर्ण नांव (आडनांव प्रथम) :

(ब) वडिलांचे / पतीचे संपूर्ण नांव :

(क) विवाहित महिलांच्या बाबतीत त्यांचे विवाहापूर्वीचे नांव :

2) (अ) राहण्याचा पत्ता (पोस्टल पिनकोडसहीत) :

(ब) दूरध्वनी क्र. (एस.टी.डी. क्रमांकासह) : -------------------------------------------------------

भ्रमणध्वनी क्र. : -------------------------------------------------------

ई-मेल आयडी : ----------------------------------------------------------

आधार कार्ड क्रमांक- : ............................................................................................................

3) लिंग : पुरुष ------------ स्त्री ---------- तृतीयपंथी ----------

4) अ) जन्मदिनांक :- (दिनांक/महिना/वर्ष)

व) अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास असलेले वय : वर्षे ......... महिने ............ दिवस..........

5) (अ) शैक्षणिक अर्हता :

| शैक्षणिक अर्हता | शालान्त परीक्षा मंडळ /विद्यापीठाचे नांव | गुणांचा तपशील | | टक्केवारी | उत्तीर्णतेचे प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | | |
| एस.एस.सी. | | | | | |
| एच.एस.सी. | | | | | |
| पशुधन पर्यवेक्षक पदविका (2 वर्ष) | | | | | |
| विशेष प्राविण्य | | | | | |

6) पशुधन पर्यवेक्षक अनुभवाचा तपशील :- (आवश्यक कागदपत्रे सोबत जोडण्यात यावी)

अ) ------------------------------------------------------------------------------------------------------------

ब) ------------------------------------------------------------------------------------------------------------

क) ----------------------------------------------------------------------------------------------------------

7) उमेदवार सध्या नोकरी करत आहे किंवा नाही -- होय/नाही
असल्यास त्याबाबतचा तपशील - ---------------------------------------------------------------------------

8) संगणक विषयक ज्ञान एम.एस.सी.आय.टी. -- होय/नाही. : ---------------------------------------------------
किंवा शासनाने विहित केलेले संगणकविषयक अभ्यासक्रम उत्तीर्ण

9) स्थानिक पोलीस स्टेशनचा पत्ता -: ----------------------------------------------------

10) अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का? -- होय /नाही.

ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

क) उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का? असल्यास तपशील द्यावा.

1. मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातील दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी -------------------- ----------------------- या पदाकरीता पात्र आहे. वरीलपैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही.अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास नवी मुंबई महानगरपालिका माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करू शकते, याची मला जाणीव आहे.
2. मी -------------------------------------------------------- पतिज्ञेवर लिहुन देतो कि, न.मु.म.पा च्या आरोग्य विभागाचे अधिनस्त पशु वैदयकिय सेवेतील -------------------------------------- या पदासाठी अर्ज केला असुन सदरचे पद हे निव्वळ कंत्राटी पध्दतीने आहे हे मला ज्ञात आहे. तसेच भविष्यात या व इतर कोणत्याही पदावर कायमस्वरुपी वा नमुमपा इतर पदावर मी कोणत्याही प्राधीकरण,मा.उचच न्यायालय इ ठिकाणी अर्ज करुन हक्क् मागणार नाही. करीता हमीपत्र देत आहे.

दिनांक :-
ठिकाण:-

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही/
(अर्जदाराचे नांव)

सोबत : १)
२)
३)